**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

==========================================================================

जावक क्रमांक – ३२९ दिनांक : २६ जानेवारी, २०२२

प्रसिद्धीपत्रक

# म्हाडा मुख्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण

मुंबई, दि. २६ जानेवारी, २०२२ - भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात 'म्हाडा'चे उपाध्यक्ष श्री. अनिल डिग्गीकर यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती श्री. विनोद घोसाळकर, 'म्हाडा'चे मुख्य अभियंता-१ श्री. धिरजकुमार पंदिरकर, मुख्य अभियंता-२ श्री. सुनील जाधव, मुख्य अभियंता-३ श्री. शिवकुमार आडे, विधी सल्लागार श्री. पी. बी. वीर, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. विकास रसाळ, म्हाडाचे सचिव श्री. राजकुमार सागर, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार श्री. प्रवीण साळुंखे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मनीषा जायभाये-धुळे, वित्त नियंत्रक श्री. एम.जे. रोड्रिक्स, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सहमुख्य अधिकारी श्री. विशाल देशमुख, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, कार्यकारी अभियंता श्री. प्रशांत धात्रक, कार्यकारी अभियंता श्री. संजय जाधव आदींसह म्हाडातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

ध्वजारोहणापूर्वी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा











